# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २५.०६.२०२६

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (१९.०६.२०२६ ते २५.०६.२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२६.०६.२०२६ ते ३०.०६.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | दिनांक | २६ | २७ | २८ | २९ | ३० |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | १.० | १०.४ | ३.६ | पाऊस (मिमी) | १५ | १४ | १२ | १० | १० |
| ३३.२ | ३३.५ | ३४.५ | ३५.० | ३१.२ | २७.० | ३०.० | कमाल तापमान (अं.से.) | ३० | ३० | ३१ | ३१ | ३० |
| २३.० | २२.८ | २२.४ | २४.४ | २३.० | २१.२ | २२.६ | किमान तापमान (अं.से.) | २३ | २३ | २३ | २२ | २२ |
| ५ | ४ | ८ | ६ | ८ | ८ | ८ | स. ढग स्थिति (आकाश) | ७ | ७ | ६ | ६ | ७ |
| ७ | ५ | ५ | ८ | ८ | ८ | ८ | दु. | | | | | |
| ८३ | ८४ | ८६ | ७७ | ८५ | ९२ | ८१ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९२ | ९० | ९० | ९२ | ९५ |
| ४८ | ४८ | ५० | ५५ | ८७ | ८७ | ९७ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ८७ | ८६ | ८६ | ८६ | ८६ |
| ४.० | ३.८ | ३.७ | ३.३ | ६.४ | ६.२ | ४.२ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १२ | ८ | १० | ९ | १२ |
| नै. | नै. | वा. | नै. | प.नै. | प.वा. | प.नै. | स. वाऱ्याची दिशा | प.नै. | प. | प.नै. | प.नै. | प.नै. |
| प.वा. | प.वा. | नै. | वा. | प.वा | नै. | प.नै. | दु. | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| १५.० | १३७.४ | ९ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

<table>
<tr><th>पीक</th><th>अवस्था</th><th colspan="3">कृषि विषयक सल्ला</th></tr>
<tr><td colspan="2">हवामान सारांश</td><td colspan="3">प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २६, २७, २८, २९ व ३० जून रोजी आकाश ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २६, २७ व २८ जून रोजी काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या तसेच २९ व ३० जून रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ३० जून पर्यंत कमाल तापमान ३०.० ते ३१.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान २२.० ते २३.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ९० ते ९५%, दुपारची सापेक्ष आद्रता ८६ ते ८७% तसेच वाऱ्याचा वेग ताशी ०८ ते १२ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.</td></tr>
<tr><td colspan="2">विस्तारित श्रेणी अंदाज</td><td colspan="3">विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक २६ जून ते २ जुलै दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी ते सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.</td></tr>
<tr><td colspan="2" rowspan="8">हवामान इशारा</td><td rowspan="2">२५.०६.२६</td><td>घाट भाग</td><td>तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता</td></tr>
<tr><td>कोल्हापूर जिल्हा</td><td>तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस व ताशी ३०–४० किमी वेगाने सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता</td></tr>
<tr><td rowspan="2">२६.०६.२६</td><td>घाट भाग</td><td>तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता</td></tr>
<tr><td>कोल्हापूर जिल्हा</td><td>तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस व ताशी ३०–४० किमी वेगाने सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता</td></tr>
<tr><td rowspan="2">२७.०६.२६</td><td>घाट भाग</td><td>तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस व ताशी ३०–४० किमी वेगाने सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता</td></tr>
<tr><td>कोल्हापूर जिल्हा</td><td>तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह मध्यम पाऊस व ताशी ४०–५० किमी वेगाने सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता</td></tr>
<tr><td rowspan="2">२८.०६.२६</td><td>घाट भाग</td><td>तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस व ताशी ३०–४० किमी वेगाने सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता</td></tr>
<tr><td>कोल्हापूर जिल्हा</td><td>तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस व ताशी ३०–४० किमी वेगाने सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता</td></tr>
<tr><td colspan="2">सामान्य सल्ला</td><td colspan="3">❖ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबाईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून "मेघदूत" अँड्रॉइड अ‍ॅप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड अ‍ॅप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>❖ पक्व झालेल्या फळे तसेच भाजीपाला पिकांची काढणी करावी व काढणी केलेला शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा</td></tr>
</table>

# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| संदेश | | **खरीप पिकाच्या पेरणीचा कालावधी साधारणपणे पिकनिहाय ७ ते १५ जुलै पर्यंत आहे. शेतकरी बांधवांनी ८० ते १०० मिमी पाऊस होईपर्यंत पेरणीची घाई करू नये.** |
| भात | रोपवाटिका | ➢ खरीप हंगामामध्ये भाताची लागवड करण्यासाठी रोपवाटिका तयार करणेकारिता गादी वाफे तयार करून घ्यावेत.<br>➢ १ मी. रुंदीचे, १५ सें.मि. उंचीचे आणि आवश्यकतेनुसार लांबीचे गादीवाफे तयार करावेत. १ हेक्टर क्षेत्रावर भात लागवडीसाठी १० गुंठे क्षेत्रावरील रोपवाटिका पुरेशी होते.<br>खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी दर्जेदार व प्रमाणित बियाण्याचे नियोजन करावे.<br>**वाणांची निवड :** हळवा: कर्जत१८४, रत्नागिरी -१,कर्जत-४, फुले राधा<br>➢ निमगरवा: फुले समृद्धी<br>➢ गरवा: रत्नागिरी -२ कर्जत-२<br>➢ सुवासिक वाण: बासमती-३७०, इंद्रायणी, भोगावती, सुगंधा<br>➢ संकरीत : सह्याद्री -१, सह्याद्री -४, सह्याद्री -५<br>➢ **जिल्ह्याच्या पश्चिम भागात ज्या ठिकाणी पुरेसा पाऊस झालेला आहे अश्या ठिकाणी भात रोप वाटिका तयार करण्याची कामे पूर्ण करावीत.** |
| नाचणी | पेरणीपूर्व तयारी | ➢ शेतीची पूर्वमशागतीची कामे नांगरणी, कुळवणी व शेणखत मिसळून घ्यावे .<br>➢ रोपवाटीकेसाठी गादीवाफे तयार करून घ्यावेत<br>➢ रोपवाटिकेसाठी वाफे तयार करताना, १ गुंठा क्षेत्रासाठी २५० किलो शेणखत चांगल्याप्रकारे जमिनीत मिसळावे |
| ऊस | वाढीची अवस्था | ➢ हुमणी किडीच्या नियंत्रणासाठी प्रकाश सापळयांचा वापर करावा.<br>➢ ऊस पिकामध्ये तणनियंत्रण करावे. |
| टोमॅटो | वाढीची अवस्था | ➢ मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, मध्यम पाऊस आणि ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता असल्याने रोपे उन्मळून पडू नये म्हणून काठीच्या किंवा बांबूच्या सहाय्याने आधार द्यावा. |
| केळी | वाढीची अवस्था | ➢ मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, मध्यम पाऊस आणि ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता असल्याने केळी झाडे उन्मळून पडू नये म्हणून काठीच्या किंवा बांबूच्या सहाय्याने आधार द्यावा. |
| सोयाबीन | पेरणीपूर्व | **वाणांची निवड :** फुले दूर्वा, फुले किमया (केडिएस ७५३), फुले संगम (केडिएस ७२६), फुले अग्रणी (केडिएस ३४४), फुले कल्याणी (डिएस २२८), जे.एस.-३३५ |
| भुईमूग | पेरणीपूर्व | **वाणांची निवड :** फुले उन्नती, फुले धनी, फुले मोरणा ,फुले वारणा |
| चवळी | पेरणीपूर्व | **वाणांची निवड :** फुले रुख्मिणी, फुले सोनाली |
| पशुधन | वाढीची | ➢ जनावरांच्या पिण्यात दूषित किंवा गाळ मिश्रण पाणी जाणार नाही याची काळजी घ्यावी.<br>➢ पावसाचे वातावरण आणि विजेचा गडगडाट होत असल्यास, शेतातील कामकाज त्वरित थांबवून जनावरांना बंदिस्त आणि सुरक्षित ठिकाणी हलवावे. |
| सामान्य सल्ला | | ➢ जमिनीची खोली लक्षात घेऊन पिकांचे नियोजन तसेच उपलब्ध जमिनीनुसार पिक व वाणांची निवड करावी.<br>➢ कमी कालावधीमध्ये येणाऱ्या वाणांचा वापर करावा.<br>➢ पाण्याचा व तापमानाचा ताण सहनशील पिके व त्यांचे वाण वापरावेत.<br>➢ आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा.<br>➢ पिकाची पेरणी ट्रॅक्टर चलित बीबीएफ पेरणी यंत्राने रुंद सरी वरंबा (BBF) पद्धतीने करावी.<br>➢ पावसाचे पाणी साठवण (शेततळे, कंपार्टमेंट बंडिंग, सरी-वरंबा पद्धत)<br>➢ जमिनीतील ओलावा संवर्धनासाठी आच्छादन, कोळपणी आणि तण नियंत्रण करावे<br>➢ ठिबक तसेच तुषार सिंचन पद्धतीचा वापर करावा.<br>➢ संतुलित खत व्यवस्थापन पत्रिकेचा खत व्यवस्थापनासाठी वापर करावा.<br>➢ जिल्हानिहाय कृषी हवामान आधारित हवामान सल्ल्याचे नियमित पालन करणे. |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर

दि. : २५.०६.२०२६

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा

सहयोगी संशोधन संचालक,

विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर